अलिबाग एसटी दगडफेकप्रकरणी एसटी चालक, 25 आंदोलकांवर गुन्हे

एसटी चालकाच्या चुकीनेच अलिबागमध्ये अपघात; चालकाला १४ दिवस न्यायालयीन कोठडी

अलिबाग : पुढारी वृत्तसेवा

अलिबागमधील एसटी स्थानक परिसरात झालेल्या अपघातप्रकरणी एसटी चालक योगेश रामभाऊ अडसूळ यास अटक करण्यात आली. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर केले असता असता त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे.

दरम्यान, अपघातानंतर झालेल्या दगडफेक प्रकरणीही पोलिसांनी २५ ते ३० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या अपघातामुळे अलिबागमधील वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर

आला आहे. गुरुवारी एसटीची धडक बसून १७ वर्षीय जयदीप बना याचा जागीच मृत्यू झाला होता. हा अपघात एसटी चालकाच्या चुकीमुळे झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

आगारात पोलीस बंदोबस्त

या अपघातानंतर वातावरण काही काळ चिघळले होते. एसटीची वाहतूक दुपारपर्यंत बंद ठेवली होती. संतप्त झालेल्या जमावाकडून एसटी गाड्यांवर दगडफेकही झाली होती. या दगडफेकी प्रकरणी अलिबाग पोलिसांनी शुक्रवारी २५ ते ३० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अपघातानंतर चालक अडसूळ हा पळून गेला होता. पोलिसांनी त्याला रात्री ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. शुक्रवारी अलिबाग येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता १४ दिवस न्यायालयीन कोठडी देण्यात आली. या अपघात प्रकरणी एसटी चालक अडसूळ याच्यावर अलिबाग पोलीस ठाणे येथे मोटार वाहन अधिनियम, १९८८ चेकलम १८४, १३४, भारतीय न्याय संहिता १०५, २८१, १२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पार्किंगअभावी वाहतुकीत विस्कळीतपणा

अपघातामुळे एसटी स्थानक रस्त्यावरील विक्रेते, खासगी वाहनांना शुक्रवारी मनाई केली होती. मात्र ही कारवाई तात्पुरती आहे. नगर परिषदेने भाजी विक्रेत्यांसाठी व्यायामशाळेजवळील जागाही दिली आहे. मात्र तिकडे कोणीही बसत नाही. सध्या नगरपरिषदेमध्ये प्रशासकीय कारभार आहे. अलिबाग नगरपरिषदमध्ये मुख्याधिकारी हे प्रभारी आहेत त्यामुळे कारवाई कोण करणार हा प्रश्नच आहे.याबाबत मुख्याधिकारी ह्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. अलिबाग शहरात पार्किंगची व्यवस्था नाही. सहा आसनी रिक्षा, दुचाकी, चारचाकी हे कोठेही आपल्या गाड्या पार्क करतात. त्यांना निश्चित अशी जागा उपलब्ध करुन दिल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था काही प्रमाणात सुरळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाहीत.

'उबाठा'चे ९ नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेत

दापोली : पुढारी वृत्तसेवा

दापोली नगर पंचायतीचे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे उपनगराध्यक्ष खालिद रखांगे यांच्यासह एकूण ९ नगरसेवकांनी २८ फेब्रुवारी रोजी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. राज्यमंत्री योगेश कदम आणि शिवसेना नेते रामदास कदम यांच्या उपस्थितीत शुक्रवारी हा पक्षप्रवेश झाला आहे. या नगरसेवकांनी १४ नगरसेवकांचा स्वतंत्र गट तयार केला असून, नगराध्यक्ष पदावर देखील दावा करण्यात येणार आहे.

जाळलेला मृतदेह सावंतवाडीतील बेपत्ता महिलेचाच

खून करणाऱ्या संशयितास अटक : खुनाचे कारण अद्यापही गुलदस्त्यातच; तपास सुरू

कणकवली : पुढारी वृत्तसेवा

चार दिवसांपूर्वी मुंबई - गोवा महामार्गावरील ओसरगाव येथे जळालेल्या स्थितीत आढळलेल्या महिलेचा मृतदेहाची ओळख पटली असून तो मृतदेह सावंतवाडी तालुक्यातील किनळे - वरचीवाडी येथील बेपत्ता झालेल्या सुचिता सुभाष सोपटे (५९) हिचा असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

कणकवली पोलीस आणि स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने सखोल तपास करत त्या मृतदेहाचा छडा लावत महिलेचा खून करून जाळणाऱ्या संशयित आरोपीला गजाआड केले आहे. वितोरिन रुजाय फर्नांडिस (४९, रा. वेंगुर्ला, आरवली-टांक) असे संशयिताचे नाव असून त्याला त्याच्या घरातून गुरुवारी रात्री अटक केली. त्याने महिलेच्या खुनाची कबुली दिली आहे मात्र हा खून नेमका कोणत्या कारणास्तव आणि कसा केला हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे. दरम्यान वितोरीन फर्नांडीस याला शुक्रवारी सायंकाळी कणकवली न्यायालयात हजर केले असता ८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

२४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास ओसरगाव येथे महामार्गानजीक अर्धवट जळालेल्या स्थितीत महिलेचा मृतदेह आढळून आला होता. मात्र मृतदेहाची ओळख पटली नव्हती, मृतदेहाचा गुडघ्यापासूनचा एक पाय आणि त्यावर पैंजण तसेच मृतदेहाच्या हातात बांगड्या, एका कानात कुडे आढळून आले होते. पोलिसांसमोर या खूनाचा उलगडा करण्याचे मोठे आव्हान होते. गेले चार दिवस कणकवली पोलिस आणि एलसीबी महिलेच्या मृतदेहाचा छडा लावण्यासाठी कसून तपास करत होते. घटनास्थळी मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे अनोखळी मृतदेह व अज्ञात आरोपीचा शोध घेण्याकरिता पोलिस अधीक्षक सिंधुदुर्ग व अप्पर पोलिस अधीक्षक सिंधुदुर्ग यांच्या सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखा व कणकवली पोलीस यांची विशेष पथके तयार करून संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा, गोवा, कर्नाटक राज्य तसेच सांगली, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील बेपत्ता महिलांची माहिती घेतली जात होती. दरम्यान घटनास्थळी फॉरेन्सीक टिमने देखील भेट देऊन नमुने घेतले होते.

खून पैशाच्या हव्यासापोटी की अन्य काही कारण...

आरोपी वितोरिन फर्नांडिस याने खुनाची कबुली दिली असली तरी खून नक्की कशासाठी केला हे स्पष्ट सांगितलेले नाही. तो विसंगत माहिती देत आहे. प्रथमदर्शनी पैशांच्या व दागिन्यांच्या हव्यासापोटी खून केल्याचे पुढे येत असले तरी अन्य काही कारण आहे का याचाही तपास पोलीस करणार आहेत. तसेच आरोपीने महिलेचा खून नेमका कसा आणि कधी केला हेही स्पष्ट झाले नाही. आरोपी त्या महिलेचा खून केल्याचे सांगत असला तरी खून नेमका कोठे केला, हे सांगितलेले नाही. आता पोलीस कोठडीच्या तपासात या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलीस शोधणार आहेत.

मुलाचे अपहरण

पेण : तालुक्यातून एका मुलाचे अपहरण करण्यात आले आहे. पेण पोलीस ठाणे हद्दीत २४ फेब्रुवारी रोजी ते २५ फेब्रुवारी रोजी रात्री ११ दरम्यान सदर मुलगा बेपत्ता झाला आहे. फिर्यादी यांचा भाचा यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतून फुस लावुन पळवून नेले आहे.

अन्नशांतवाडीत घरात प्रौढाचा खून

एक संशयित ताब्यात : खुनाचे कारण अस्पष्ट

कुडाळ : पुढारी वृत्तसेवा

कवठी-अन्नशांतवाडी येथील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संदीप उर्फ बाळा दामोदर करलकर (५२) याचा राहत्या घरातच खून करण्यात आला. ही घटना गुरुवारी सायंकाळी ६ वा. च्या सुमारास घडली.

खूनप्रकरणी गावातीलच एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात आणखी दोघा-तिघांचा समावेश असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. खुनाचे कारण मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे.

घटनेची माहिती मयत संदीप याचा भाऊ संतोष करलकर याने निवती पोलीस ठाण्यात दिली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची टीम दाखल झाली. कवठी-अन्नशांतवाडी ही अतिदुर्गम भागात वसलेली छोटी वाडी आहे. मयत संदीप उर्फ बाळा दामोदर करलकर हा घरी एकटाच राहत होता. त्याचे वाडीत सहसा कोणासोबत पटत नव्हते. संदीपला अजून दोन भाऊ असून त्यापैकी एका भावाचे निधन झाले आहे. दुसरा भाऊ संतोष हा मुंबईला नोकरीला असतो. रविवारी त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्यावेळी संतोष गावी आला होता.

राजापूर येथे आज 'उबाठा'चा कार्यकर्ता संवाद मेळावा

राजापूर : पुढारी वृत्तसेवा

विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव आणि त्यानंतर माजी आमदार राजन साळवी यांच्यासहित पक्षाच्या ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केलेल्या पक्ष त्यागाच्या पार्श्वभूमीवर पक्षाचा कोसळता डोलारा सावरण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सरसावला असून कार्यकर्त्यांना उभारी देण्यासाठी राजापुरात नवीन कार्यालयाचा शुभारंभ आणि कार्यकर्त्यांची संवाद मेळावा शनिवार १ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला शिवसेना नेते आणि सचिव, माजी खा. विनायक राऊत यांच्यासह माजी राज्यमंत्री रवींद्र माने माजी आमदार गणपतराव कदम, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दत्ता कदम आदी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहाणार आहेत.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

नवी मुंबई परिमंडळ कार्यालय
सिडको जुनी प्रशासकीय इमारत, पी - १७, सेक्टर - १, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३, दूर. ०२२-२०८७५१/५२.
ई-मेल : dzmnvm@mahabank.co.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरित बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अनुसार व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून तुम्ही **१. श्रीमती वंदना भरत शेळके (कर्जदार), २. श्री. भरत कृष्णा शेळके (सहकर्जदार)** यांना अनुसूचीतील मालमत्तेच्या गहाणअंतर्गत सूचनेत निर्देशित मुदत कर्ज सुविधेअंतर्गत रक्कम **रु. ५८,६५,०६९.३५ अधिक दि. २६.११.२०२४ पासून द.सा. १०.६०% दराने व्याज तसेच एमसीएलआर + बीएसएस दराने ०.२५% + १.२५% स्वरूपात** लागू न केलेले व्याज अधिक वसुलीकरिता लागलेले पुढील मूल्य प्रभार आदी रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना दि. २६.११.२०२४ सदर कायद्याच्या अनुच्छेद १३ (२) अंतर्गत जारी केली होती.

कर्जदारांनी सदर थकित रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना विशेषत: वरील निर्देशित केल्यानुसार कर्जदार व हमीदारांना तसेच आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याच्या अनुच्छेद १३चे उप अनुच्छेद (४) सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२ च्या नियम ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. २५.०२.२०२५** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदारांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रभारांतर्गत वरील निर्देशित रकमेच्या अधीन असतील. कायद्याच्या अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद ८ च्या तरतुदींअंतर्गत कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.

स्थावर मालमत्तेचे विवरण

पुढील विवरणीत फ्लॅटचा सर्व तो भाग व भूखंड - अर्थात फ्लॅट क्र. ९१, ९ वा मजला, इमारत ए - ५, अश्वत्थ गार्डन एनक्लेव्ह को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., मोजमापित ७५३चौ. फूट चटई क्षेत्रफळ अर्थात ९०४.०० चौ. फूट बिल्ट अप, ४ खाल्यांचा समावेश असलेली तसेच गावातील सदर जमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावर निर्मित, नोंदणीकरण जिल्हा मुंबई, उपजिल्हा मुंबई उपनगर जिल्हा, कुर्ला येथील, सिटी - सर्व्हे क्र. ८ए/१पार्ट, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०७९ येथील.

दिनांक : २५.०२.२०२५ **प्राधिकृत अधिकारी व मुख्य व्यवस्थापक**
ठिकाण : विक्रोळी **बँक ऑफ महाराष्ट्र**

जाळलेला मृतदेह सावंतवाडीतील बेपत्ता महिलेचाच

खून करणाऱ्या संशयितास अटक : खुनाचे कारण अद्यापही गुलदस्त्यातच; तपास सुरू

कणकवली : पुढारी वृत्तसेवा

चार दिवसांपूर्वी मुंबई - गोवा महामार्गावरील ओसरगाव येथे जळालेल्या स्थितीत आढळलेल्या महिलेचा मृतदेहाची ओळख पटली असून तो मृतदेह सावंतवाडी तालुक्यातील किनळे - वरचीवाडी येथील बेपत्ता झालेल्या सुचिता सुभाष सोपटे (५९) हिचा असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

कणकवली पोलीस आणि स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने सखोल तपास करत त्या मृतदेहाचा छडा लावत महिलेचा खून करून जाळणाऱ्या संशयित आरोपीला गजाआड केले आहे. वितोरिन रुजाय फर्नांडिस (४९, रा. वेंगुर्ला, आरवली-टांक) असे संशयिताचे नाव असून त्याला त्याच्या घरातून गुरुवारी रात्री अटक केली. त्याने महिलेच्या खुनाची कबुली दिली आहे मात्र हा खून नेमका कोणत्या कारणास्तव आणि कसा केला हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे. दरम्यान वितोरीन फर्नांडीस याला शुक्रवारी सायंकाळी कणकवली न्यायालयात हजर केले असता ८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

२४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास ओसरगाव येथे महामार्गानजीक अर्धवट जळालेल्या स्थितीत महिलेचा मृतदेह आढळून आला होता. मात्र मृतदेहाची ओळख पटली नव्हती, मृतदेहाचा गुडघ्यापासूनचा एक पाय आणि त्यावर पैंजण तसेच मृतदेहाच्या हातात बांगड्या, एका कानात कुडे आढळून आले होते. पोलिसांसमोर या खूनाचा उलगडा करण्याचे मोठे आव्हान होते. गेले चार दिवस कणकवली पोलिस आणि एलसीबी महिलेच्या मृतदेहाचा छडा लावण्यासाठी कसून तपास करत होते. घटनास्थळी मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे अनोखळी मृतदेह व अज्ञात आरोपीचा शोध घेण्याकरिता पोलिस अधीक्षक सिंधुदुर्ग व अप्पर पोलिस अधीक्षक सिंधुदुर्ग यांच्या सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखा व कणकवली पोलीस यांची विशेष पथके तयार करून संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा, गोवा, कर्नाटक राज्य तसेच सांगली, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील बेपत्ता महिलांची माहिती घेतली जात होती. दरम्यान घटनास्थळी फॉरेन्सीक टिमने देखील भेट देऊन नमुने घेतले होते.

खून पैशाच्या हव्यासापोटी की अन्य काही कारण...

आरोपी वितोरिन फर्नांडिस याने खुनाची कबुली दिली असली तरी खून नक्की कशासाठी केला हे स्पष्ट सांगितलेले नाही. तो विसंगत माहिती देत आहे. प्रथमदर्शनी पैशांच्या व दागिन्यांच्या हव्यासापोटी खून केल्याचे पुढे येत असले तरी अन्य काही कारण आहे का याचाही तपास पोलीस करणार आहेत. तसेच आरोपीने महिलेचा खून नेमका कसा आणि कधी केला हेही स्पष्ट झाले नाही. आरोपी त्या महिलेचा खून केल्याचे सांगत असला तरी खून नेमका कोठे केला, हे सांगितलेले नाही. आता पोलीस कोठडीच्या तपासात या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलीस शोधणार आहेत.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्ता (**'सदर मालमत्ता'**) ही श्रीमती दीपा कटयाल इंजिनीयर यांच्या मालकीची आहे जे सदर मालमत्तेच्या विक्रीकरिता आमच्या अशिलांसमवेत बोलणी करीत आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागाच्याहक्कांविरोधात वा संदर्भात विक्री, गहाण, विनिमय, प्रभार, भाडेकरार, धारणाधिकार, उत्तराधिकार, भेट, विमोचन, न्यास, कुटुंब व्यवस्था, करार, देखभाल, ताबा, सुविधाधिकार, कर्जे, आगाऊ रकमा, निषेधाज्ञा, विचाराधीन विवाद व/वा कोणताही न्यायालय, न्यायाधिकरण (महसूल वा लवाद) वा प्राधिकारी यांचा कोणताही निवाडा, आदेश वा हुकुमाअंतर्गत वा कोणत्याही विक्री करारांतर्गत वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात सदर तारखेपासून **१५ दिवसांच्या** आत अशा दाव्यांच्या हक्कांच्या दस्तावेजांच्या सर्व प्रतींसमवेत **किंजल शाह**, कार्यालयाचा पत्ता **सर्व्हे क्र. ४१, ४२/१३, ४२/१८, गाव चाळगाव, एमआयडीसी, तळोजा, पनवेल, रायगड, महाराष्ट्र - ४१० २०६, संपर्क क्र.९५९४२२७३५६** येथे सूचित करावे अन्यथा असे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील व आमचे अशील पुढील प्रक्रिया करतील.

अनुसूची

युनिट क्र. ए-११२१, मोजमापित ५५.९८ चौरस मीटर चटई क्षेत्रफळ (रेरानुसार), ११ वा मजला, इमारतीचे नाव "दी एपीसेंटर", ऑफ ईस्टर्न फ्री वे, बीईएसटी कॉलनी, शिवाजी चौकाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई - ४० ००७१ येथील, एक फिक्स्ड् पझल कार पार्किंग क्र. ११९ समवेत, पोडियम लेव्हल पी २ वरील.

मुंबई:
दि. ०१.०३.२०२५

सही/-
किंजल शाह

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

स्ट्रेस्ड् ॲसेट मॅनेजमेंट ब्रॅन्च : सर्कल ऑफिस बिल्डिंग, ८ वा मजला, बी विंग, सी-१४, जी ब्लॉक, बान्द्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, बान्द्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
दूर. क्र. : ०२२-२६७२८७२२/८७७१/८७४४; ई-मेल : cb15550@canarabank.com

ताबा सूचना (अनुभाग १३(४)) (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरित कॅनरा बँक अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा ५४/२००२) (यापुढे कायद्याम्हणून संबोधला जाईल) अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३(१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये दिलेल्या कर्जदार **मे. करंजा टर्मिनल ॲन्ड लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड** यांनी सूचनेत निर्देशित रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या प्राप्तीपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी सूचना जारी केली होती.

१. कॅनरा बँकेने दिनांक २५.०९.२०२४ रोजी सूचनेमध्ये नमूद केलेली **रक्कम रु. ३२४,००,५५,८३७.६१ (रु. तीनशे चोवीस कोरोड पंचावन्न हजार आठशे सदतीस व एकसष्ट पैसे मात्र)** परतफेडीकरिता मागणी सूचना जारी केली.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ व ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. २७.०२.२०२५ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे **कॅनरा बँक यांच्या प्रभारांतर्गत** रक्कम **दि. ३०.०६.२०२४ रोजीनुसार रु. ३२४,००,५५,८३७.६१ (रु. तीनशे चोवीस कोरोड पंचावन्न हजार आठशे सदतीस व एकसष्ट पैसे मात्र) व व्याज** आदी रकमेच्या अधीन असतील.

कायद्याच्या अनुच्छेद १३(८) च्या तरतुदींअंतर्गत कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.

स्थावर/ अस्थिर मालमत्तेचे विवरण

स्थावर			शीर्षक धारकाचे नाव
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (एमएमबी) सोबत अंमलात आणलेल्या भाडेपट्टा करारांतर्गत भाडेपट्टा मालमत्तेवरील पहिला शुल्क. मे. करंजा टर्मिनल ॲन्ड लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडने स्थापित व उभारलेल्या बहुउद्देशीय टर्मिनलसह १००० मीटरच्या संपूर्ण वॉटरफ्रंट व जमीन अर्थात समुद्राच्या तळाशी ए) आंतर-भरती क्षेत्र (एचटीएल व एलटीएल दरम्यान) व बी) पाण्याखालील क्षेत्र (एलटीएल व समुद्राच्या सीमेदरम्यान). पाण्याचा सर्व भाग १००० मीटर लांबीचा आहे ज्यामध्ये चांजे गावाच्या पाणवठ्यावरील बहुउद्देशीय टर्मिनल, करंजा खाडी किनारपट्टी, तालुका उरण, जिल्हा रायगड, राज्य महाराष्ट्र- ४००७०२ यांचा समावेश आहे. आंतरभरती क्षेत्र व पाण्याखालील क्षेत्रासह समुद्रकिनाऱ्याची गणना खालीलप्रमाणे केली आहे.			मे. करंजा टर्मिनल ॲन्ड लॉजिस्टिक्स प्रा.लि.
ए)	इंटर टाईडल एरिया (आयआयटीएल व एलटीएल दरम्यान)	८२१४४० चौ.मीटर	
बी)	इंटर टाईडल	निल चौ.मीटर	

तारीख : २७.०२.२०२५ सही/-
ठिकाण : मुंबई प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

बँक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

मुंबई महानगर उत्तर विभाग : ३ रा मजला, बडोदा हाऊस, दिवाण शॉपिंग सेंटरच्या मागे, एस व्ही रोडच्या मागे, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई.
ई-मेल : recovery.mmnr@bankofbaroda.co.in **संकेतस्थळ :** www.bankofbaroda.com

ई-लिलाव कम विक्री सूचना

बँक ऑफ बडोदा, विभागीय कार्यालय, मुंबई महानगर उत्तर विभाग, मुंबई जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव कमी विक्री ई-लिलाव प्रक्रियेच्या माध्यमातून "जसे आहे जिथे आहे", "जे आहे ते आहे", विदाउट रिकोर्स तत्त्वावर घेत आहे. वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात आल्यानुसार आहे.

अनु. क्रमांक	कर्जदाराचे नाव	मॉडेल	उत्पादनाचे वर्ष	नोंदणी क्रमांक	(१) राखीव किंमत (२) ईएमडी रक्कम	बोली वाढविण्याची रक्कम	संपर्क क्रमांक	पार्किंगचे ठिकाण
१	मेसर्स भानुदास ट्रान्स्पोर्टेशन कंपनी	व्हीई कमर्शिअल वेहिकल्स लिमिटेड आयशर प्रो ५०३५ डी सीबीसी २०१९	२०१९	जीए-०५-टी-५३१३	१ राखीव किंमत : रु ४,५०,००० /- २. ईएमडी रक्कम : रु ४५०००. ००	रु ५०००. ००	शाखाप्रमुख अशोकवन मोबाईल क्रमांक : ९६१९४३०३२५	मुंबई मेट्रो उत्तर विभाग : ३ रा मजला, बडोदा हाऊस, दिवाण शॉपिंग सेंटरच्या मागे, एस व्ही रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई संपर्क क्रमांक : ८६९३००७८४६ / ९८२०२४४९८१
२	मेसर्स सिद्धिविनायक इंटरप्रायझेस	ह्युंदाई सेंट सीआरडीआय प्राईम टी+	२०१७	एम एच ४३ बीजी ८२४७	१. राखीव किंमत : रु २,०३,००० /- २. ईएमडी रक्कम : रु २०,३००. ००	रु. २०००. ००	शाखाप्रमुख मराठा कॉलनी, मोबाईल क्रमांक : ९९७८७७२२७७	
३	श्री संदेश कोंडिबा जाधव	इऑन के १. ० मॅग्ना+ (०)-ऑप्शन	२०१७	एम एच ०४ एच एक्स २७३९	१. राखीव किंमत : रु २,०३,००० /- २. ईएमडी रक्कम : रु २०,३००. ००	रु. २०००. ००	शाखाप्रमुख मीरा रोड, श्रृष्टी कॉम्प्लेक्स मोबाईल क्रमांक : ८०८०१३५८१८	

महत्त्वाच्या तारखा	वाहनांची पाहणी तारीख आणि वेळ	ईएमडी सादर करण्याची तारीख	ई-लिलावाची तारीख आणि वेळ
	२९/०३/२०२५ सकाळी ११. ०० ते संध्याकाळी ४. ००	०३/०४/२०२५ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत	०४/०४/२०२५ दुपारी २. ०० ते संध्याकाळी ६.००

* सूचना : अंतिम विक्री किमतीवर जीएसटी लागू असेल
विक्री प्रक्रियेच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया
https://www.bankofbaroda.in/e-auction.htm and https://bob.auctiontiger.net
येथे देण्यात आलेली लिंक पाहावी

दिनांक : २८/०२/२०२५ प्राधिकृत अधिकारी
स्थळ : मुंबई बँक ऑफ बडोदा

सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी येथे स्कॅन करा

बेलापूर येथील मा. न्यायाधीश सो, कौटूंबिक न्यायालय, बेलापूर यांच्या न्यायालयात, नवी मुंबई

पिटीशन ए-६९८/२०२४
निशाणी - ११

श्रीमती अनुराधा आशिष सावंत
पुर्वाश्रमीचे नांव दिपाली चंद्रकांत कांबळे :- अर्जदार
विरूध्द
श्री. आशिष अनंत सावंत :- सामनेवाले

जाहीर नोटीस

याद्वारे **श्री. आशिष अनंत सावंत राहणार रुम नं. ३०१, हरी गार्डन व्हयू सोसायटी, सेक्टर नं.१०, नवीन पनवेल** व तमाम कुटूंबियांना कळविण्यात येते की, येथील अर्जदाराने अर्ज **हिंदु विवाह कायदा १९५५ कलम १३ (१) (१अ) (१ब) प्रमाणे** अर्जदार यांनी बेलापूर येथील **मा. न्यायाधीश सो, कौटूंबिक न्यायालय, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील सामनेवाले हे मा. न्यायालयात हजर झालेले नाहीत म्हणून समन्स व नोटीस पाठवून अंतिम कळविले होते. तरीही सामनेवाले कोणत्याही प्रकारचा प्रतिवाद देत नाहीत. सदरहू सामनेवाले हे दिलेल्या पत्त्यावर राहतात किंवा राहत नाहीत, तसेच मे. न्यायालयात हजर का होत नाहीत. याबाबतही कोणताही बोध होत नाही. म्हणून सदर अर्जातील सुनावणीकामी व न्यायनिर्णयाचे दृष्टीने पुढील अडचणी निर्माण होवू नयेत किंवा येवू नयेत म्हणून अर्जदार तर्फे सदरची जाहीर नोटीस सामनेवालेचे माहितीकरीता प्रसिध्द करीत आहोत. सदरहू दाव्याची सुनावणीची पुढील **तारीख १८ एप्रिल, २०२५** अशी नेमण्यात आली आहे. सदर तारखेस सामनेवाले किंवा त्यांचे तर्फे कोणीही प्रतिनिधी हजर न राहिल्यास सदर सामनेवालेस या दाव्यात स्वारस्य नाही असे गृहित धरून सदर दाव्याची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५** रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

कनिष्ठ लिपिक
कौटूंबिक न्यायालय, बेलापूर
नवी मुंबई

शिक्का

हुकूमावरून,
सही/-
प्रबंधक
कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई

यूको बैंक (भारत सरकार का उपक्रम)
UCO BANK (A Govt. of India Undertaking)
सम्मान आपके विश्वास का Honours Your Trust

परिमंडळ कार्यालय, यूको बँक इमारत, १ ला मजला, क्र. ३५९, डॉ. दादाभाई नवरोजी मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दूर. क्र. ०२२- ४०५४३०२/४०१, ई-मेल : zo.mumbai@ucobank.co.in

लॉकर तोडून उघडण्याकरिता वर्तमानपत्रांतील जाहीर सूचना

अ. क्र.	नाव	लॉकर क्रमांक	थकित रक्कम	शाखेचे नाव	पत्ता
१.	अमरिन फैयाजुद्दीन शेख	एए०१०	११५८२.००	खार शाखा (०२१६)	खोली क्र. १ अल्लुद्दीन गली, जोगेश्वरी (पू.), मुंबई -६०.
२.	किशीन शोभराज असरानी	एए०१७	१५००१.००	खार शाखा (०२१६)	फ्लॅट क्र. १, तळमजला, मुकुंद निवासच्या पुढे, मुंबई - ५२.
३.	मोनिका महाजन	एए१३६	४९८८.००	खार शाखा (०२१६)	३०२, मार्बल आर्च, वांद्रे, मुंबई -५०.
४.	देवी डी. नस्ता	एए३६२	१४८२०.००	खार शाखा (०२१६)	वेस्ट विंड अपार्टमेंट, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, कटारिया कॉलनी, दादर, मुंबई - १६.
५.	अक्षता अर्जुन पै	एबी१७७	२८७४९.००	खार शाखा (०२१६)	फ्लॅट क्र. ५०२, एफ विंग, लेक होम्स, पवई, मुंबई - ७६.
६.	विनया कुमार